


दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : १२६ ● पुणे ● गुरुवार, दि. २७ मार्च २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

# आईवडिलांना पोटगी

## मुलाकडून आईवडिलांना सांभाळण्यास नकार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आई-वडील आणि मुलाच्या नात्याला काळिमा फासणारी घटना पुण्यात घडली आहे. नवसाने झालेल्या मुलाने आई-वडिलांना सांभाळण्यास नकार दिला. त्यामुळे आईवडिलांना मुलाविरुद्ध थेट न्यायालयाची पायरी चढावी लागली. मात्र न्यायालयाने निकाल देत मुलाने आईवडिलांना दैनंदिन खर्चासाठी पैसे द्यावे असे आदेश दिले आहे. ॲड. जान्हवी भोसले यांनी या खटल्याबाबत सविस्तर माहिती दिली. तीन मुलींनंतर नवससायास करून आईवडिलांना चौथा मुलगा झाला. त्याला लहानाचे मोठे केले. पुण्यात एका खाजगी कंपनीत मुलगा नोकरीस लागला. वडील एका खाजगी कंपनीत नोकरीस होते. त्यांना १३०० रुपये पेन्शन आहे. मुलाचे लग्न झाले. मात्र लग्नानंतर सासू-सूनेचे न पटल्यामुळे मुलगा आपल्या पत्नीसोबत वेगळा राहण्यास गेला. त्याने एक घर घेतले. मात्र इकडे मिळणाऱ्या पेन्शनमध्ये आईवडिलांचे भागत नव्हते. मुलाने दैनंदिन खर्चासाठी काही रक्कम द्यावी अशी आईवडिलांची माफक अपेक्षा होती. मात्र अशी आर्थिक मदत करण्यास मुलाने नकार दिला. आईवडील दोघेही आजारी होते. त्यांनी घर विकण्याचे ठरवले. मात्र मुलाने घरावर कर्ज काढले होते. हे कर्ज भरावे. म्हणजे घर विकून येणाऱ्या पैशात छोट्या घरात राहता येईल, असे आईवडिलांनी सांगितले. मात्र मुलाने त्याला देखील नकार दिला. त्यामुळे आईवडिलांना न्यायालयात जाण्यावाचून पर्याय उरला नाही. मुलगा एका खाजगी कंपनीत नोकरीस आहे. त्याला ६० हजार पगार आहे. त्याची पत्नी देखील कमावती आहे. आपल्यावर पत्नीची जबाबदारी आहे. घर, गाडी यांच्या कर्जाचे हप्ते असल्याने आपल्याला महिना ५८ हजार रुपये खर्च करावे लागतात. त्यामुळे आईवडिलांना कोणतीही आर्थिक मदत करण्यास मुलाने नकार दिला. कालांतराने मुलगा आईवडिलांच्या घरखर्चासाठी पाच हजार पुरेसे आहेत असे म्हणत ३७०० रुपये देण्यास तयार झाला. पेन्शनची रक्कम त्यात टाकून आईवडिलांचा खर्च भागेल असा त्याचा युक्तिवाद होता.



### न्यायालयाचा निकाल

या प्रकरणी न्यायालयाने एका वर्षात निकाल दिला. आईवडिलांच्या बाजूने ॲड. जान्हवी भोसले आणि ॲड. भालचंद्र धापटे यांनी युक्तिवाद केला. न्यायालयाने मुलाने आईवडिलांना प्रत्येकी आठ हजार रुपये पोटगी द्यावी असा निकाल दिला आहे.

### वडिलांना ब्रेन हॅमरेज

दरम्यान वडिल हे ब्रेन हॅमरेज झाल्याने आजारी असल्याची माहिती समोर आली आहे. अजूनही त्यांचा सांभाळ कोण करणार असा प्रश्न आहे.











# सिक्युरिटी नंबर प्लेट; नोंदणी केंद्राची संख्या वाढवा

जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा क्रमांक पाटी बसवून घेण्याचा निर्णय केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर घेतला आहे. त्याचे स्वागत करण्याऐवजी विरोधकांनी त्यांच्यावर नेहमीप्रमाणे टीका सुरू केली. केंद्र सरकारने कोणताही निर्णय अथवा कायदा केला की, त्याला विरोध करणारी एक विशिष्ट जमात आपल्याला गेल्या दहा वर्षांत पाहायला हमखास मिळते. तेच चेहरे असतात. तीच मंडळी असतात. या निर्णयाबाबत सांगायचे झाले तर केंद्र सरकारने घेतलेल्या बंधनकारक निर्णयामुळे गरिबांच्या खिशाला आता कसा फटका बसणार असा प्रचार सुरू झाला होता. मात्र, वस्तुस्थिती वेगळी होती. आता, जे वाहन खरेदी करतात, वाहन चालवतात, ते गरीब दुर्बल घटकांतील आहेत असे कसे म्हणावे? हाही एक कोड्यात टाकणारा प्रश्न आहे. तरीही महाराष्ट्रासह काही राज्यांत उच्च सुरक्षा पाटीवरून केंद्र सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न झाला; परंतु तो निष्फळ ठरला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात नव्या नियमानुसार वाहनांची नंबर प्लेट बसवून घेणाऱ्या वाहनांची संख्या हळूहळू का असेना पण वाढते आहे, ही जमेची बाजू आहे.

सुरुवातीला राज्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या वाहनांना 'उच्च सुरक्षा क्रमांक पाटी' (हाय सिक्युरिटी नंबर प्लेट – एचएसआरपी) बसवून घेणे बंधनकारक करण्यात आले होते. राज्यातील आतापर्यंत १७ लाख वाहनांनी एचएसआरपीसाठी नोंदणी केली असून, त्यापैकी चार लाख वाहनांवर उच्च सुरक्षा नंबर प्लेट लावण्यात आल्या आहेत. खरं तर सरकारच्या या योजनेतर्गत २०१९ च्या पूर्वी नोंदणीकृत सुमारे पावणेदोन कोटी वाहनांना एचएसआरपी बसवली जाणार आहे.

सुरक्षेच्या दृष्टिकोनातून वाहनाला हाय सिक्युरिटी नंबर प्लेट एकदा लावल्यानंतर ती पुन्हा काढता येत नाही. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने बनविण्यात आलेली हाय सिक्युरिटी नंबर प्लेट टॅम्परप्रूफ असते. हाय सिक्युरिटी नंबर प्लेट ॲल्युमिनिअम मिश्र धातूपासून बनविलेली असते. या नंबर प्लेटवर निळ्या रंगाच्या चक्राचे होलोग्राम आणि वाहन क्रमांकाच्या काळ्या तिरप्या ओळीत




अक्षरे लिहिलेली असतात. त्यामुळे, राष्ट्रीय सुरक्षा, वाहनांमुळे होणारे गुन्हे कमी व्हावेत, छेडछाड आणि बनावटगिरी रोखण्यासाठी तसेच रस्त्यांवर चालणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांची ओळख पटविण्यासाठी, अनेक प्रकारच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने वाहनांना एचएसआरपी बंधनकारक करण्याचा केंद्राचा निर्णय हा स्वागतार्ह बाब आहे, असे म्हणायला हवे.

मात्र, अंमलबजावणीबाबत सरकारी यंत्रणा कुठे तरी कमी पडत आहे, ही बाब लपून राहिलेली नाही. कारण या गतीने नोंदणी करण्याचे नियोजन ठरविले आहे, ते पाहता राज्यात या नियमाच्या अंमलबजावणीची यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी दोन ते तीन वर्षांचा कालावधी लागणार आहे. सध्या ऑनलाइन यंत्रणेवर अवलंबून राहावे लागत आहे. वाहनधारकांना घरबसल्या ऑनलाइन अर्ज करण्यासाठी 'आरटीओ' कार्यालयानुसार रोझमेर्टा सेफ्टी सिस्टीम, रिअल मॅझोन इंडिया आणि एफटीए एचएसआरपी सोल्यूशन या तीन कंपन्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र त्यातही मोठ्या प्रमाणावर तांत्रिक अडचण येत आहे. त्यामुळे ही पाटी लावण्यासाठी उत्पादक कंपन्या, ऑनलाइन प्रणाली नोंदणी सुविधा, वाहन स्वास्थ्य चाचणी केंद्र (फिटनेस सर्टिफिकेट सेटर), पाटी बसवून देण्यासाठी साहित्याची उपलब्धता, उत्पादन क्षमता आदींचे नियोजन कोलडमलेले सध्या तरी दिसत आहे. संकेतस्थळावर नोंदणी करणाऱ्या वाहनधारकांना वेळ उपलब्ध होत नाही. काही काळ ही सुविधा बंद करण्यात आली होती, अशाही अनेक तक्रारी आहेत.

याच कालावधीत परिवहन विभागाने जुन्या वाहनांसाठी उच्च सुरक्षा नंबर प्लेट लावण्याची प्रक्रिया आता जलद करण्यासाठी सध्या तरी संकेतस्थळावर नोंदणी करण्याची सोय उपलब्ध केली आहे, असा दावा करत, उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी – HSRP बसवण्यासाठी आता ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे एकप्रकारे ग्राहकांना मोठा दिलासा मानावा लागेल. राज्यात मुंबई शहराप्रमाणे ज्या ठिकाणी जास्त गाड्यांची नंबर प्लेट बसविण्यासाठी नोंदणी करायची बाकी आहे, त्या ठिकाणी सुविधा केंद्र उभारणे आवश्यक आहे. तसे केले तरच, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे पालन करण्याची प्रक्रिया सरकारकडून पूर्ण होईल.

दुसरा मुद्दा असा आहे की, या नंबर प्लेटवरून सरकारकडून जनतेची लूट होत असल्याचा प्रचार केला जात होता; परंतु पेट्रोलचा भाव १०० रुपयांपेक्षा एका लिटरमागे असतानाही त्याबाबत तक्रार न करणारा वाहन चालक किंवा मालक ४५० रुपयांच्या नंबर प्लेटवरून नाराज होईल, असे मानने हा विरोधाभास नाही का? तरी, केंद्र सरकारबद्दल आकस असलेल्या मंडळींनी नंबर प्लेटचा मुद्दाही चर्चेला आणण्याचा प्रयत्न केला होता; परंतु त्याकडे सगळ्यांनी दुर्लक्ष केल्याचे या घडीला तरी दिसत आहे. महाराष्ट्रामध्ये दुचाकी वाहनासाठी एचएसआरपी बसविण्यासाठी रुपये ४५० हा दर निश्चित करण्यात आला. हा दर इतर राज्यांच्या तुलनेत कसा कमी आहे, हे सांगण्याची वेळ राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यावर आली. त्यामुळे उच्च सुरक्षा नंबर प्लेटच्या दरांमध्ये विसंगती असल्याचे आरोप होत आहेत, ते चुकीचे असल्याचे सरनाईक यांनी विधिमंडळात सांगितले. त्यामुळे आता किमतीचा मुद्दा निकाली निघाला असल्याने, नोंदणीसाठी जास्त सुविधा देणे हे सरकारचे काम बाकी राहिले आहे.

# कचरा गाडी पुन्हा सुरू करा : भूपेंद्र मोरे

## त्रिमूर्ती हॉस्पीटल, परिसर शिवतीर्थ नगर भागातील कचऱ्याचा प्रश्नासाठी मोरेंचा पुढाकार



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

गेले अनेक वर्ष पासून पुणे महानगरपालिकेतील त्रिमूर्ती हॉस्पिटल परिसर, शिवतीर्थ नगर भागातील नागरिकांना कचऱ्याचा प्रचंड व नाहक मनस्ताप होत आहे. तो थांबवण्यासाठी नागरिकांच्या सेवेत कचऱ्याची गाडी पूर्ववत सुरू करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी पुणे महानगरपालिकेकडे केली आहे.

आठ दिवसापूर्वी सिंहगड क्षेत्रीय कार्यालय येथे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ रूपाली ताई चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वाची नागरी समस्यांवर ती बैठक घेण्यात आली. त्यामध्ये असणाऱ्या मुद्द्यांमध्ये महत्त्वाचा मुद्दा शिवतीर्थ नगर येथील कचरा उचलणे बाबत व रस्ते साफसफाई बाबत प्रश्न भूपेंद्र मोरे यांनी मांडला होता .

त्या अनुषंगाने नागरिकांच्या कचऱ्याच्या समस्येसाठी धायरी आरोग्य कोठीचे अधिकारी श्री. गजानन गजधने यांनी वडगाव खुर्द शिवतीर्थ नगर, त्रिमूर्ती हॉस्पिटल परिसराची पाहणी केली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी या भागातील रस्ते साफसफाईसाठीही कर्मचारी नियुक्ती करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. कचऱ्याची गाडी पूर्ववत सुरू करावी अशी आग्रही मागणी केली.

त्यावर श्री.गजधने यांनी लवकरात लवकर या समस्या ठेवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासित केले. भविष्यात कचऱ्याची समस्या निवारणासाठी योग्य नियंत्रण राखले जाईल असा शब्द भूपेंद्र मोरे, उपस्थित नागरिकांना दिला.

यावेळी स्वच्छ संस्थेचे कर्मचारी, व नागरिक उपस्थित होते यामुळे परिसरातील कचऱ्याची समस्या सुटण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अस्ताव्यस्त कचऱ्यामुळे होणाऱ्या विविध समस्यांना आळाही बसणार आहे.

## 'मातृका' मासिक पाळीच्या रजेसह कामाच्या ठिकाणी समावेशकता मजबूत केली

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एसर इंडिया ने अधिक समावेशक आणि सहाय्यक कामाच्या ठिकाणी प्रोत्साहन देण्यासाठी मासिक पाळी रजा धोरण 'मातृका' लाँच केले आहे. हा उपक्रम एसर इंडियाच्या महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या कल्याणाची ओळख पटवणाऱ्या आणि त्यांचा आदर करणाऱ्या धोरणांसह सक्षम बनवण्याच्या वचनबद्धतेला अधोरेखित करतो. या धोरणांतर्गत, महिला कर्मचाऱ्यांना दर महिन्याला एक अतिरिक्त दिवस पगारी रजा मिळेल, ज्यामुळे त्यांना त्यांच्या नियमित रजेच्या हक्कांवर परिणाम न होता त्यांच्या मासिक पाळीच्या आरोग्याला प्राधान्य देता येईल. हे पाऊल एसर इंडियाच्या लिंग समावेशकता, आरोग्य आणि समग्र कर्मचारी समर्थनाला चालना देणारे कार्यस्थळ तयार करण्याच्या व्यापक दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. "एक कार्यस्थळ जे आपल्या लोकांना खरोखर समर्थन देते ते धोरणांच्या पलीकडे जाते, ते समज, आदर आणि वास्तविक बदल वाढवते. "मातृका" मासिक पाळी रजा धोरणासह, आम्ही महिलांचे आरोग्य आणि कल्याण याबद्दल संभाषण सामान्य करण्याच्या दिशेने एक पाऊल उचलत आहोत. सर्वसमावेशकता म्हणजे केवळ प्रतिनिधित्व नाही; हे आमच्या कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन वास्तवांना ओळखणे आणि संबोधित करणे याबद्दल आहे.

## सिंहगड रोड परिसरातील अनियमित नियोजनशून्य पाणीपुरवठ्याच्या निषेधार्थ

# हंडामोर्चा आंदोलनाचा हरिदास चरवड यांचा इशारा

**वडगाव (दै. आरंभ पर्व)**

गेल्या काही महिन्यापासून सिंहगड रोड परिसरातील वडगाव बुद्रुक , वडगाव खुर्द , धायरी, माणिकबाग , हिंगणे, आनंदनगर परिसरातील नागरिकांना अनियमित व अपुरा पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी वारंवार प्राप्त होत आहेत. तरीही पाणीपुरवठा विभागाकडून आवश्यक कार्यवाही होत नसल्याने

माजी नगरसेवक हरिदास चरवड हंडामोर्चा आंदोलनाचा इशारा दिला आहे. या प्रकरणी विविध विभागांना निवेदन दिले आहे.

ह्यामध्ये पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक पूर्णपणे कोलमडून पडले



आहे. असंख्य तांत्रिक अडचणी – देखभाल दुरुस्ती च्या नावाखाली सात्यात्याने मनमानी कारभार सुरु आहे. छोट्या - मोठ्या सोसायट्यांना टँकरचा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. उन्हाळ्याचे दिवस सुरु झाले आहे त्यात अपुऱ्या आणि अनियमित पाणीपुरवठ्यामुळे नागरिक हैराण झाले आहे. ग्रामीण भागासारखी दुष्काळ सदृश्य परिस्थिती या परिसरात निर्माण होत आहे. जाणून बुजून पाण्याचा दाब (प्रेशर) कमी केला जात आहे. तसेच पाण्याच्या वेळेतही कपात केली जात आहे. वडगाव जलशुद्धीकरण प्रकल्पावर काही अधिकारी गैरव्यवहार करून बेकायदेशीर कामे करीत आहे.

आगामी ५ दिवसात यावर तोडगा न काढल्यास बेजबाबदार पाणीपुरवठा विभागाच्या प्रशासनास जाग आणण्यासाठी आणि समस्येचे गांभीर्य त्यांच्या लक्षात येण्यासाठी येथील त्रस्त नागरिकांसमवेत हजारो महिला वर्गासह पाणीपुरवठा विभागाच्या कार्यलयावर हंडा मोर्चा काढण्याचा इशारा माजी नगरसेवक हरिभाऊ चरवड यांनी दिला आहे. हे निवेदन त्यांनी पुणे मनपा आयुक्त , पुणे मनपा पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता, कनिष्ट अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय, वडगाव जलशुद्धीकरण अधिकारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सिंहगड रोड पोलीस स्टेशन यांना दिले आहे.

# थोडक्यात

## "माझी प्रारतना" या नव्या मराठी चित्रपटाचं टिझर रिलीझ !!




पुणे (आरंभ पर्व) : प्रेम म्हणजे जीवनात प्रत्येक गोष्टीत सौंदर्य शोधण्याची कला, पण सर्वांना प्रेम सहज मिळत नाही. अशीच एक अभूतपूर्व प्रेम कथा येत्या ९ मे २०२५ ला आपल्याला अनुभवायला मिळणार आहे. पद्माराज राजगोपाल नायर लिखित आणि दिग्दर्शित "माझी प्रारतना" हा नवा सिनेमा आपल्या भेटीला येत आहे. ह्याच चित्रपटाचा दमदार टिझर प्रदर्शित झालाय. प्रेम, प्रेमातील विश्वासघात आणि त्या विकट परिस्थितीत प्रेम मिळवण्यासाठीची जिद्द या टिझर मध्ये पहायला मिळते. "माझी प्रारतना" हा सिनेमा ब्रिटिश काळात, महाराष्ट्राच्या अगदी ग्रामीण भागात घडलेली संगीत प्रधान प्रेम कथा आहे. आयुष्यात किती ही अडचणी असतील तरी प्रेम मात्र जीवनात सर्वकाही जिंकण्याची ताकद आहे अशी स्तब्ध करणारी हि कहाणी आहे. या चित्रपटात पद्माराज राजगोपाल नायर आणि अनुषा अडेप हे कलाकार मुख्य भूमिकेत आहेत. मराठी सिनेश्रृष्टीतील आणखी काही उत्कृष्ट कलाकार आपल्याला दिसणार आहेत. एस आर एम फिल्म स्कूल प्रस्तुत "माझी प्रारतना" या चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन पद्माराज राजगोपाल नायर ह्यांनी केलं आहे, पद्माराज नायर फिल्म्स ह्यांची निर्मिती आहे तर विश्वजित सी टी ह्यांनी संगीत दिलंय. सिनेमाचं पोस्टर आणि आता टिझर पाहून प्रेक्षकांची उत्सुकता वाढली आहे. अपरिमित ताकद, अथांग समर्पण, असे प्रेम, जे इतिहासावर स्वतःची छाप सोडेल असा हा "माझी प्रारतना" सिनेमा ९ मे २०२५ ला आपल्या जवळच्या सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे




## Amazon.in : बिजनेसच्या दुहेरी अंकी वाढीसाठी पुणे ठरले साक्षीदार

पुणे (आरंभ पर्व) : Amazon.in ने आज महाराष्ट्र आणि पुण्यातील त्यांच्या होम, किचन, आऊटडोर्स बिजनेसमधील वार्षिक 25% (वर्ष-दर-वर्ष) वाढ घोषित केली आहे, ज्यामुळे राज्यातील नवीन ग्राहकांमध्ये सुमारे 15% वाढ झाली आहे. या क्षेत्रात स्मार्ट होम, फिटनेस, सिक्युरिटी, किचन अप्लायंसेस आणि गार्डनिंग श्रेणीतील उत्पादनांना मोठी मागणी दिसून आली. महाराष्ट्रात, रॅकेट खेळांच्या मागणीत वाढ झाली आहे, बॅडमिंटन आणि टेनिस रॅकेटच्या विक्रीत अनुक्रमे 140% आणि 115% वार्षिक वाढ झाली आहे. दरम्यान, या क्षेत्रात क्रिकेट स्थानिक पसंतीचे ठरले असून क्रिकेट बॅटच्या विक्रीत वार्षिक 50% पेक्षा जास्त वाढ झाली आहे. पुण्यात झालेल्या दिवसभर चालणाऱ्या या इव्हेंटमध्ये फर्निचर, घरगुती वापराच्या वस्तू, किचन आणि अप्लायंसेस, होम डेकोर आणि लाइटिंग, स्पोर्ट्स आणि फिटनेस, इलेक्ट्रिक व्हेइकल्स, ऑटो ॲक्सेसरीज, आउटडोर्स आणि गार्डनिंग आणि यांसारख्या बऱ्याच उत्पादनांचा समावेश होता. या अद्वितीय प्रदर्शनामुळे मीडिया आणि भागीदारांना ॲमेझॉन इंडियाच्या नेतृत्वाशी संवाद साधताना टॉप ब्रँड आणि उत्पादने अनुभवण्याची संधी मिळाली. या कार्यक्रमात ॲमेझॉनच्या इंटरेस्टिंग किचन फाइंड्स स्टोअरफ्रंटची सुद्धा सुरुवात झाली, जे होम आणि किचन श्रेणीतील अद्वितीय आणि नाविन्यपूर्ण उत्पादने असलेले एक खास तयार केलेले ठिकाण आहे. ॲमेझॉन इंडियाच्या किचन आणि आऊटडोर्सचे संचालक के.एन. श्रीनाथ म्हणाले, "पुण्यात ॲमेझॉन होम अँड किचन एक्सपिरिएन्स ॲरेना 2.0 ची सुरुवात करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. होम, किचन आणि आऊटडोर्स ऑनलाइन शॉपिंगकडे अधिकाधिक ग्राहक वळत असल्याने, आम्ही निरोगी, स्वच्छ आणि अधिक सोयीस्कर जीवनशैलीकडे एक मजबूत वळण म्हणून बघत आहोत, ज्यामुळे महाराष्ट्र आणि पुण्यात वार्षिक दुहेरी अंकी वाढ होत आहे. Amazon.in वर, आम्ही उच्च-गुणवत्तेच्या उत्पादनांची विस्तृत निवड आणि ग्राहकांच्या बदलत्या पसंतींना पूर्ण करणाऱ्या उत्तम डील देऊन खरेदीचा अनुभव सुधारण्यासाठी वचनबद्ध आहोत.". महाराष्ट्र आणि पुण्यात Amazon.in च्या लक्षात आलेले काही खरेदीचे प्रकार येथे देत आहेत : टिकाऊ सोल्युशनसाठी वाढती मागणी: महाराष्ट्रातील ग्राहक टिकाऊ लिविंग सोल्युशन अवलंब वाढत्या प्रमाणात करत आहेत, राज्यभरात सौर पॅनेलच्या वापराची वाढ वार्षिक 110% पेक्षा जास्त आहे आणि पुण्यात त्याचा वापर वार्षिक 60% ने वाढत आहे.






## थोडक्यात



### 'इन्स्टिट्यूट ऑफ पावटॉलॉजी' चित्रपटाचा उत्कंठावर्धक ट्रेलर भेटीला

पुणे (आरंभ पर्व) : 'इन्स्टिट्यूट ऑफ पावटॉलॉजी' या शीर्षकापासूनच लक्ष वेधून घेणाऱ्या आगामी मराठी चित्रपटाच्या उत्सुकता वाढवणाऱ्या टिझर मागोमाग आता ट्रेलरही प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. सध्याच्या शिक्षणव्यवस्थेवर भाष्य करणाऱ्या या चित्रपटात एका नव्या विषयावर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. चित्रपटाचा विषय 'पावटॉलॉजी' आहे. हे नेमके काय? याचे 'इन्स्टिट्यूट' कसे असू शकते? 'पावटे' म्हणजे काय? त्यांना या इन्स्टिट्यूटमध्ये काय शिकवले जाईल? असे एक ना अनेक प्रश्न 'इन्स्टिट्यूट ऑफ पावटॉलॉजी'चा ट्रेलर पाहिल्यावर मनात येतात. या सर्व प्रश्नांची उत्तरे प्रेक्षकांना ११ एप्रिलला मिळणार आहे. याच दिवशी हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. फटमार फिल्म्सच्या सहयोगाने हेमंत चव्हाण, प्रद्योत पेंढरकर आणि निखिल मगर यांच्या सिक्स पर्पल हार्टसची प्रस्तुती असलेल्या 'इन्स्टिट्यूट ऑफ पावटॉलॉजी' या मराठी चित्रपटाची निर्मिती नेहा गुप्ता आणि प्रसाद नामजोशी यांनी केली आहे. विजय नारायण गवंडे आणि श्रीकांत देसाई या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. 'इन्स्टिट्यूट ऑफ पावटॉलॉजी'चे दिग्दर्शन प्रसाद नामजोशी आणि सागर वंजारी यांनी केले आहे. या दिग्दर्शक द्वयींनी पुन्हा एकदा आपल्या चित्रपटाद्वारे उत्कंठावर्धक विषय सादर केला आहे. 'इन्स्टिट्यूट ऑफ पावटॉलॉजी'च्या ट्रेलरमध्ये चित्रपटाबाबतची थोडक्यात माहिती देण्यात आली आहे. अभिनेते गिरीश कुलकर्णींनी चित्रपटात म्हटल्याप्रमाणे आता दिवस बदलले आहेत. याच बदललेल्या दिवसांचे प्रतिबिंब 'इन्स्टिट्यूट ऑफ पावटॉलॉजी' चित्रपटात पाहायला मिळणार आहे. अभिनेते सयाजी शिंदे यांच्या मनात मात्र 'इन्स्टिट्यूट ऑफ पावटॉलॉजी'बाबत काही प्रश्न आहेत. यांची उत्तरे प्रेक्षकांना चित्रपटगृहांत मिळणार आहे. शिक्षकाच्या भूमिकेतील गिरीश कुलकर्णी या चित्रपटात कशा प्रकारची 'पावटॉलॉजी' शिकवणार आहेत हे जाणण्याची उत्सुकता ट्रेलर पाहिल्यावर निर्माण होते. हा चित्रपट सध्याच्या शिक्षणव्यवस्थेवर भाष्य करणारा आहे. येत्या उन्हाळ्यात कल्ला करण्यासाठी 'पावटे' सज्ज झाल्याचेही ट्रेलर पाहिल्यावर जाणवते. या 'पावट्यांना' सांभाळून त्यांना शिकवण्याचे वेगळेच आव्हान चित्रपटातील शिक्षकांसमोर असणार आहे. या जोडीला 'पावट्यांची' धम्माल-मस्ती आणि कर्णमधूर गीत-संगीताची किनार चित्रपटाला जोडण्यात आली आहे. पावटॉलॉजीतील एक्स फॅक्टर शिकवणारे तज्ज्ञही चित्रपटात दिसणार आहेत. त्यांचा एक वेगळाच ट्रॅक चित्रपटात धम्माल करणार आहे. 'पावटेश्वर महाराज की जय...' अशी घोषणा देत आणि 'आपला अभ्यासक्रम सुपरहिट आहे...', असे म्हणत 'इन्स्टिट्यूट ऑफ पावटॉलॉजी' चित्रपटाचा उत्कंठावर्धक ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. 'रंगा पतंगा' आणि 'रेडू' या चित्रपटांच्या निर्मात्यांची ही कलाकृती आहे. अर्थपूर्ण संवाद आणि दोन विरोधी विचारधारांमधील संघर्ष हा या चित्रपटाचा महत्त्वाचा भाग ठरणार आहे.



### PURE तर्फे PuREPower उत्पादने सादर

मुंबई (आरंभ पर्व) : इलेक्ट्रिक मोबिलिटी आणि स्वच्छ ऊर्जा नाविन्यपूर्णतेतील अग्रगण्य कंपनी PURE ने आज भारताच्या ऊर्जा संक्रमणाला गती देण्यासाठी सुसज्ज PuREPower या क्रांतिकारी ऊर्जा संचय उत्पादनांची घोषणा केली. PuREPower हे PuREPower Home, PuREPower Commercial, आणि आगामी PuREPower Grid यांच्या माध्यमातून विविध क्षेत्रांतील ऊर्जा गरजा पूर्ण करते. भारत डीकार्बोनायझेशन आणि अक्षय ऊर्जा उद्दिष्टांच्या दिशेने वाटचाल करत असताना विश्वसनीय, विस्तारीत आणि शाश्वत ऊर्जा संचय उत्पादनांची गरज पूर्ण करण्याच्या दृष्टीने या उत्पादनांची रचना करण्यात आली आहे. मजबूत डीलर/वितरक नेटवर्कच्या माध्यमातून PURE प्रगत ऊर्जा संचय उत्पादने सर्वसामान्यांसाठी सहज उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विकसित करत आहे. पुढील 18 महिन्यांत, कंपनी भारतभर 300 हून अधिक टचपॉइंट्स स्थापन करणार असून आपल्या सहयोगींना समग्र तांत्रिक व व्यावसायिक सहाय्य पुरवणार आहे. PuREPower Home ची किंमत 74,999/- रु. (एक्स-फॅक्टरी) पासून सुरू आहे. सादरीकरणाच्या वेळी बोलताना PURE चे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. निशांत डोंगरी यांनी भारताच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणात ऊर्जा संचयाच्या भूमिकेवर भर दिला.

# पै. युवराज जाधव यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

- पै.युवराज जाधव यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा
- जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त माऊली अनाथ आश्रमात
- छावा चित्रपटाच्या शोचे आयोजन





वडगाव (दै. आरंभ पर्व)

राष्ट्रीय तालीम संघ पुणेचे सदस्य, खडकवासला भाजपा विधानसभा उपाध्यक्ष ,सामाजिक कार्यकर्ते पै. युवराज जाधव यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

वाढदिवसाचे औचित्य साधून माऊली अनाथ आश्रम येथे लहान मुलांसाठी छावा चित्रपटाचे आयोजन करण्यात आले. यावेळी

अनाथ आश्रमास अन्नधान्य तसेच इतर साहित्य भेट देण्यात आले. पै. जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दूरध्वनीद्वारे त्यांना शुभेच्छा दिल्या.

यांच्या अभिष्टचिंतन सोहळा निमित्त त्यांचे स्नेही माजी नगरसेवक सचिनभाऊ दोडके, विलास कथूरे सर, युवा नेते सुमितभाऊ बेनकर,दिलीप दादा गायकवाड , सुमित आप्पा घुले,बाळासाहेब जाधव, संजय (बाबू )दोडके, यांच्यासह ईलांझा क्रिकेट क्लब आणि मित्रपरिवार चे सदस्य उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा देत भावी वाटचालीसाठीही शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना पै. युवराज जाधव यांनी जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. जनतेच्या आशीर्वादाच्या बळावर पुणे महानगरपालिका निवडणूक लढवण्याचा त्यांनी मानस व्यक्त केला.

वडगाव (बु) येथे उत्साहामध्ये हा वाढदिवस साजरा करण्यात आला.

या अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन चैतन्य जाधव आणि नितीन येनपुरे यांनी केले.

## एचडीएफसी कॅपिटल ने टोटल इनव्हायर्नमेंटमध्ये केली ₹ १,३०० कोटींची गुंतवणूक

पुणे (दै. आरंभ पर्व)

बंगळूर येथे उच्च गुणवत्तेच्या घरांच्या विकासार्थ १३०० कोटी रु. चा प्लॅटफॉर्म तयार करण्यासाठी एचडीएफसी कॅपिटल या एचडीएफसी समूहाच्या रियल इस्टेट प्रायव्हेट इक्विटी शाखेने टोटल इनव्हायर्नमेंटशी भागीदारी केली.



टोटल इनव्हायर्नमेंट हा दक्षिण भारतातील एक आघाडीचा रियल इस्टेट विकासक आहे.

या धोरणात्मक भागीदारीमुळे टोटल इनव्हायर्नमेंटद्वारे सध्या विकसित करण्यात येत असलेल्या १६ मिलियन चौरस फुट क्षेत्राच्या निवासी प्रकल्पांमध्ये ६.५ मिलियन चौरस फुट नवीन निवासी प्रकल्पांची भर पडेल. या नवीन निवासी प्रकल्पांचे एकत्रित एकूण विकास मूल्य (जीडीव्ही) १०,१०० कोटी रु. असेल आणि हे प्रकल्प येत्या चार ते पाच वर्षांत पूर्ण करण्यात येतील. ही भागीदारी शाश्वत, ग्रीनफील्ड निवासी प्रकल्प विकसित करेल जे शहराच्या रहिवाशांना राहण्याच्या दर्जेदार जागा प्रदान करून शहराचे गृहनिर्माण क्षेत्र अधिक सुंदर बनवेल. सदर घडामोडीविषयी टिप्पणी करताना एचडीएफसी कॅपिटलचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विपुल रुंगटा म्हणाले, एक उत्तम ट्रॅक रेकॉर्ड असेलेल्या, विश्वासार्ह रियल इस्टेट विकासकाशी असलेली आमची भागीदारी मजबूत करण्याबाबत एचडीएफसी कॅपिटल वचनबद्ध आहे.

## शिवस्फूर्ती प्रतिष्ठान व वारसा सोशल फाउंडेशन तर्फे डॉ. उर्मिला शिंदे यांना जिजाऊ-सावित्री पुरस्कार

पुणे (दै. आरंभ पर्व)

महिला दिन, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व शिवपुत्र संभाजी महाराज स्मृतिदिन, जगद्गुरू श्रीसंत तुकाराम बीज यानिमित्ताने विश्रांतवाडी येथे शिवस्फूर्ती प्रतिष्ठान व वारसा सोशल फाउंडेशनतर्फे महिला विचारांचा जागर केला आणि आरोग्य क्षेत्रांत काम करणाऱ्या डॉ उर्मिला शिंदे यांना जिजाऊ-सावित्री पुरस्कार सन्मानचिन्ह,शाल व पुस्तके भेट देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी प्रमुख अतिथी स्वाती देशमुख, एव्हरेस्टवीर श्रीहरी तापकीर, पुणे मनपा निवृत्त अतिरिक्त आयुक्त ज्ञानेश्वर मोळक, ॲड. शैलजा मोळक व अध्यक्ष प्राची दुधाने हे उपस्थित होते.




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अनिता देशपांडे यांनी, संयोजन प्राची दुधाने यांनी केले,यावेळी प्रज्ञेश मोळक, डॉ.मनीषा वारे, डॉ.लता पाडेकर, कांचन जुन्नरकर,महानंदा गवळे उपस्थित होते. स्वाती देशमुख, प्राची दुधाने, आरती घुले, यांनी आपापले मनोगत व्यक्त केले.

## 'अंतर योग फाउंडेशन तर्फे सर्वात भव्य-दिव्य 'महाचडी होमा'चे आयोजन

### २९-३० मार्च २०२५ रोजी, नेस्को, गोरेगाव (पूर्व), मुंबई येथे

नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

२६ आणि २७ फेब्रुवारी २०२५ रोजी भव्य दिव्य महाशिवरात्री महोत्सवाचे अत्यंत यशस्वी आयोजन केल्यानंतर, आता 'अंतर योग फाउंडेशन', प्रख्यात आध्यात्मिक सद्गुरु, क्रांतिकारी महानायक आणि ज्ञानाचे महासागर आचार्य उपेंद्रजी यांच्या मार्गदर्शनाखाली 'महाचंडी होमा'चे आयोजन २९-३० मार्च २०२५ रोजी, ग्रांडे बॅक्कैट, नेस्को, गोरेगाव (पूर्व), मुंबई येथे करत आहे. २९ आणि ३० मार्च २०२५ या दोन दिवशी सकाळी ८ ते रात्री ८ दरम्यान हे आयोजन होणार आहे.



दोन दिवसांच्या या भव्य दिव्य आयोजनादरम्यान अंतर योग फाउंडेशनचे प्रख्यात अध्यात्मिक सदगुरू, आचार्य उपेंद्रजी यांनी रचलेल्या, आजतागायत हजारो लोकांना त्वरीत शक्ती, संपत्ती आणि विवेकबुद्धी एकत्रितपणे मिळवून देणाऱ्या 'अंतर योग श्री दुर्गा सप्तशती तंत्रोक्त बीज मंत्र साधना' या ग्रंथाचे लोकार्पण होणारआहे . तसेच विविध क्षेत्रातील १० यशस्वी आणि कर्तृत्ववान महिलांचा, त्यांना देवी दुर्गामातेचे मूर्त रूप समजून अंतर योग फाउंडेशन तर्फे सत्कार केला जाणार आहे. दोन दिवसांच्या या भव्य दिव्य आयोजनादरम्यान सहभागी झालेल्या साधकांना आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणारा, दैवी संरक्षण प्रदान करणारा आणि भौतिक सुख व भरभराट प्राप्त करून देणाऱ्या दुर्मिळ व त्वरित फलंदायी साधनांचा अनुभव मिळणार आहे. या महोत्सवात देशातील अनेक आध्यात्मिक गुरू, राजकीय नेते, उद्योगपती, क्रीडा व चित्रपट क्षेत्रातील दिग्गज आणि हजारो साधक सहभागी होतील. अधिक माहितीसाठी, कृपया संपर्क करा ९१ -७७१०९ ४८४६१

महाचंडी होमाच्या भव्य आयोजनाची आकर्षक वैशिष्ट्ये

महाचंडी होमाच्या दोन दिवसांच्या या आयोजनामध्ये पहिल्या दिवशी शनिवार, २९ मार्च २०२५ रोजी श्री गणेश पूजा आणि प्रत्येकाचे आंतरिक शुद्धीकरण होण्यासाठी विधी व विशेष साधना केली जाणार आहे. त्यानंतर जीवनातील अडथळे दूर करून विवेकबुद्धी जागृत करणाऱ्या शक्तिशाली गणेश मंत्रांचा जप होणार आहे.त्यानंतर दैवी चंडी होम आणि चंडी पाठ यांचे आयोजन यज्ञसंकुलात केले जाणार असून आचार्यजींद्वारे सहभागी होणाऱ्या भक्तांच्या कल्याणासाठी आणि राष्ट्राच्या समृद्धीसाठी महासंकल्प घेतला जाणार आहे.यानंतर दुर्गा सप्तशती मधील गूढ रहस्ये उलगडणारे जीवन परिवर्तनकारी विशेष ज्ञान सत्र आहे.याशिवायआचार्य उपेंद्रजी द्वारा रचित 'अंतर योग श्री दुर्गा सप्तशती'च्या ७०० शक्तिशाली दुर्मिळ बीज मंत्रांची साधना संपन्न होणार आहे.. ४.५ तासांच्या दिव्य चंडीपाठाची फलश्रुती या साधनेद्वारे केवळ ३० मिनिटांमध्ये मिळते याचा अनुभव हजारो साधकांनी आजवर घेतला असून अनेक अग्रणी आध्यात्मिक गुरूंनी या साधनेची दिव्यता ओळखली आहे. यानंतर आचार्यजींनी रचलेल्या 'अंतर योग श्री दुर्गा सप्तशती तंत्रोक्त बीज मंत्र साधना' ग्रंथाचे (मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशा तिन्ही भाषेत) लोकार्पण होणार आहे.याशिवाय पहिल्या दिवशी विविध क्षेत्रातील १० कर्तृत्ववान महिलांचा त्यांना देवी दुर्गामातेचेमूर्त रूप समजून आदरसत्कार केला जाणार आहे. त्यांचे प्रेरणादायी अनुभव ऐकण्याची दुर्मिळ संधी मिळणार आहे. 'कुमारिका पूजन' ही संपन्न होणार आहे.

पहिल्या दिवसाची सांगता महाकाली साधना, यज्ञ आणि अभिषेकाने होणार आहे. पूर्ण दिवस दुर्गा सप्तशती बीजमंत्र साधनेसह, चंडी होमाच्या पवित्र अग्निमध्ये ७०० आहुती अर्पण करणारी ४५ मिनिटांची आवर्तने पार पडणार आहेत. ज्यात साधकांना प्रत्यक्ष ७०० आहुती देण्याची संधी मिळणार आहे.तसेच विद्यार्थ्यांचे तिसरे नेत्र जागृत करून त्यांची स्मरणशक्ती, बुद्धी, एकाग्रता आणि कलात्मकता वाढवणारी शक्तिशाली 'सरस्वती दीक्षा' दिली जाणार आहे. विशेष करून शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच त्यांचे पालकही याचा लाभ घेऊ शकतात.याशिवाय पालक आणि विद्यार्थ्यांसाठी 'तुमच्या मुलांना प्रतिभावान कसे बनवायचे' या विषयावर मार्गदर्शन संत्र होणार आहे.

विशेष म्हणजे हजारो साधकांना त्यांच्या तणाव, चिंता आणि शारीरिक व मानसिक व्याधींपासून मुक्त करणारी विशेष शक्तिशाली 'शिव साधना' सुद्धा याच दिवशी घेतली जाणार आहे.

ही साधना त्वरित उपचार प्रदान करणारी तसेच आंतरिक रोगनिवारण शक्ती जागृत करणारी आहे. सायंकाळच्या सत्रात दरम्यान महालक्ष्मी साधना आणि श्रीविद्या साधना होणार असून त्यातून भाविकांना जीवन परिवर्तित करणारे, असीम संपत्ती व समृद्धी आकर्षित करण्याचे ज्ञान-विज्ञान व साधना दिली जाणार आहे.तसेच आंतरिक रोगनिवारण शक्ती जागृत करणारी आहे.दुसऱ्या दिवसाची सांगता भव्य आरती आणि पूर्णाहुतीने होईल.

### होमाचे ऐतिहासिक महत्व

**आचार्य उपेंद्रजी म्हणाले, "महाचंडी होम केवळ एक साधा सोहळा नाही, तर हे एक वैश्विक शक्तीकडून आमंत्रण आहे -ज्यामुळे लाखो लोकांचे जीवन बदलणार आहे. अंतर योग द्वारे महाचंडी होम केला जाईल ज्यामुळे उपस्थित साधकांना त्यांच्या जीवनात दिव्य संरक्षण, मानसिक शांती, भौतिक समृद्धी, आणि आत्मविश्वास प्राप्त होईल अशी भविष्यवाणी २००० वर्षांपूर्वी महर्षी विश्वामित्र आणि अगस्त्य महर्षींनी केली होती. या दिव्य सोहळ्यात सहभागी होऊन, तुम्ही जीवनातील सर्व अडचणींना पार करून, सशक्त आणि समृद्ध जीवन जगण्याची संधी मिळवू शकता."**

## युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरम तर्फे गुणवंत विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रम संपन्न

लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)

युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरमच्या वतीने कै. डॉ. बी. एन. देशपांडे व डॉ. विनोद डोंबे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गुणवंत विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रम संपन्न झाला . महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक द्वारे नोव्हेंबर २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या बीएएमएस परीक्षेत उत्तीर्ण तसेच संस्थेच्या मोफत UPSC, MPSC मार्गदर्शन व शिष्यवृत्ती कार्यक्रमांतर्गत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा या कार्यक्रमात विशेष गौरव करण्यात आला. हडपसर येथील टेरिटरी रेस्टॉरंट येथे कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी बीएएमएस अंतिम परीक्षेत विद्यापीठात प्रथम तीन क्रमांक मिळवणारे डॉ. काथार तेजस, डॉ. खडकीकर आदिती आणि डॉ. साक्षी राठोड यांचा तसेच विविध विषयांमध्ये प्रथम क्रमांक मिळवलेल्या डॉ. अश्विनी पैठाणे (कायचिकित्सा) आणि डॉ. खडकीकर आदिती (शल्यतंत्र) यांचा सत्कार करण्यात आला.



संस्थेच्या मार्गदर्शनाखाली UPSC परीक्षेत यश मिळवलेल्या सोहम तेबरीवाल, शुभम थिटे, मंगेश खिलारे, प्रितेश बाविस्कर यांचा तसेच MPSC परीक्षेत यश संपादन केलेल्या विनय पवार, धनंजय घुले, कु. किशोरी घोरपडे आणि मंगेश सुरुशे यांचा गौरव करण्यात आला. CAPF परीक्षेत यश मिळवलेल्या अक्षय कारंडे, तुषार जाधव, ओंकार शिंदे आणि PSI परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या तुषार खेतमाळीस व अजित पाटील यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आयुष मंत्रालयाचे सल्लागार वैद्य मनोज नेसरी, निवृत्त पोलीस महासंचालक प्रबोध कुमार, IAS अधिकारी सागर डोईफोडे, डॉ. महेश दळे, IPS अधिकारी डॉ. केतन पाटील, IPS अधिकारी सागर खरडे, राज देशमुख इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांनी युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरमच्या कार्याचे कौतुक केले. वैद्य मनोज नेसरी यांनी विद्यार्थ्यांच्या प्रोत्साहनासाठी असे कार्यक्रम गरजेचे असल्याचे सांगितले. निवृत्त पोलीस महासंचालक प्रबोध कुमार यांनी संस्थेच्या कार्याचा विस्तार पंजाब व हरियाणा राज्यांत करण्याचा मानस व्यक्त केला.

IAS अधिकारी सागर डोईफोडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांनी समाजासाठी योगदान देण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. विक्रम गायकवाड यांनी युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरमच्या कार्याचा आढावा घेतला. त्यांनी UPSC व MPSC विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन मार्गदर्शन व आर्थिक मदतीबाबत माहिती दिली. संस्थेच्या उपक्रमांमुळे आतापर्यंत २६ प्रशासकीय अधिकारी घडल्याचा त्यांनी उल्लेख केला.युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरमच्या वतीने ५ जून २०२४ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कळसुबाई शिखराच्या पायथ्याशी वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

तसेच, स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांसाठी प्रबोध कुमार यांची चीफ मेंटॉर म्हणून निवड करण्यात आली असून, श्रीमती प्राची देशपांडे, डॉ. ज्योती डोंबे, डॉ. सूरज इंगोले यांची संस्थेच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

संस्थेचे विश्वस्त डॉ. समीर ननावरे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. डॉ. कल्पेश वाणी, रोहन बोरसे, डॉ. सोनल भालेराव, डॉ. पुस्तके, डॉ. प्रशांत पाटील तसेच विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. निशिगंधा अभंग यांनी केले.



## थेऊर येथील कारखान्याच्या जमीन विक्रीच्या निर्णयाला

# स्थगिती मिळण्यासाठी सभासद कृती समितीचे साखर आयुक्तांना निवेदन

### संचालकांच्या मनमानी कारभाराची चौकशी करण्याची मागणी

> वारस नोंदीचे अर्ज मंजूर न करता दप्तर उपलब्ध नाही, निधी उपलब्धतेनंतर कर्मचारी नेमून अर्जाबाबत निर्णय घेऊ असे सांगतात. मग बारा महिन्यात सभासदांसाठी एक कर्मचारी देखील संचालक मंडळाला का नेमता आला नाही. प्र.कार्यकारी संचालक वार्षिक सभेचे इतिवृत्त मागणीचा अर्ज घेण्यास नकार देतात सहकारी संस्था अधिनियम कलम 32 नुसार माहिती देण्यास टाळाटाळ करतात. कारखान्याची कर्जे व इतर देणे याबाबतची प्रमाणित केलेली आकडेवारी संचालक मंडळाला देता आली नाहीत. यावरून संचालक मंडळाचा मनमानी व सभासदांचे हित विरोधी कारभार उघडीस येतो.
>
> - राजेंद्र चौधरी कारखान्याचे सभासद



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

२६ फेब्रुवारी रोजी यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाने घेतलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत जमीन विक्रीचा प्रस्ताव अभुतपुर्व गोंधळात मंजूर झाला . मात्र याला कारखान्याच्या शेतकरी सभासद कृती समितीने कडाडून विरोध केला असून जमीन विक्रीच्या निर्णयाला स्थगिती देऊन संचालक मंडळाच्या मनमानी कारभाराची चौकशी करावी अशा आशयाची मागणी साखर आयुक्तांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे .

यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या सद्यस्थितीतील आर्थिक प्रश्न , कारखान्याला येणे असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या रकमा आणि विद्यमान संचालक मंडळाच्या मनमानी कारभाराबाबत आज ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार साहेबांना शेतकरी कृती समिती शिष्टमंडळाने भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. यावेळी साहेबांनी विविध मुद्यांवर चर्चा करून मार्गदर्शन केले. शिष्टमंडळात शेतकरी कृती समितीचे अध्यक्ष विकास लवांडे , सचिव लोकेश कानकाटे , सदस्य राजेंद्र चौधरी ,अलंकार कांचन उपस्थित होते .

पुणे जिल्ह्यातील यशवंत सहकारी साखर कारखाना लि. चिंतामणीनगर थेऊर ता.हवेली जि. पुणे या कारखान्यावर मागील काही महिन्यापासून संचालक मंडळ कार्यरत आहे. सदर कारखाना गैरव्यवहार, गैरकारभारामुळे झालेल्या कर्जबाजारीपणामुळे मागील १४ वर्षापासून बंद अवस्थेत आहे. तो सुरू व्हावा यासाठी आम्ही वारंवार विविध पातळीवर प्रयत्न केले जात आहे .

आता कारखान्याच्या मालकीची थेऊर येथील ९९.२७ एकर जमीन कृषि उत्पन्न बाजार समिती पुणे यांना विक्री करण्याचा संचालक मंडळाने गेल्या काही दिवसांपासून प्रयत्न चालविला आहे. कारखान्याचे चेअरमन व संचालक मंडळाच्या मनमानी निर्णयाला आमचा विरोध असून त्या निर्णयाला तात्काळ स्थगिती द्यावी अशी मागणी कृती समितीने केली आहे .

कारखान्याचे चेअरमन व संचालक मंडळाने काखान्याला विवध प्रकारच्या येणे असलेल्या कोट्यावधी रुपयांच्या रकमा वसूली करण्याचा कोणताही प्रयत्न केलेल्या दिसून येत नाही. त्यामध्ये कारखान्याच्या रयत सर्व सेवा संस्थेकडून कारखान्याला जवळ पास १३-१४ कोटी रुपये येणे आहे. हे अनेक लेखा परीक्षण अहवालात व कलम ८३, कलम ८८ च्या चौकशी अहवालात स्पष्ट झालेले आहे.

त्याशिवाय दि. १०/१२/२०१४ रोजी प्राधिकृत अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अंतर्गत दाखल केलेल्या अहवालानुसार तत्कालीन चेअरमन व संचालक मंडळावर जबाबदारी निश्चित केलेली आहे. त्यानुसार दिनांक ०६.०२.२०१५ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९८ अन्वये वसूली प्रमाणपूर्व नोटिस संबंधितांना प्रादेशिक प्रादेशिक सहसंचालक (साखर) पुणे विभाग यांनी बजावली होती. सदर रक्कम जवळपास १४ कोटी रुपये वसुलीसाठी आपल्या कार्यालयाकडून अथवा विद्यमान चेअरमन संचालक मंडळाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. विद्यमान चेअरमन व संचालक मंडळाने सभासदांना विश्वासात न घेता मनमानी कारभार चालविला असून सहकारी कायदे, नियम पायदळी तुडविण्याचे प्रयत्न चालविले आहेत.

कारखान्याच्या मालकीची जमीन महाराष्ट राज्य सहकारी बँकेच्या ताब्यात आहे त्यांचे संमती शिवाय जमीन विक्रीस काढली आहे. कारखान्याला एकूण देणी किती आहेत यांचा कोणताही ताळेबंद हिशोब वगैरे सभासदांना दिलेले नाही. देणे रकमेपेक्षा खूप जास्त रकमेची जमीन विक्रीस काढली आहे. जाहीर लिलाव पद्धत न वापरता थेट पुणे कृषि उत्पन्न बाजार समिती सोबत व्यवहार कशाच्या आधारे , कोणत्या नियमाने फिक्स केला आहे ?. याची सभसदांना काहीच माहिती नाही. यात त्यांच्या हेतुवर संशय येत आहे.

त्यांनी दिनांक २६.०२.२०२५ रोजी वार्षिक सभा घेतल्याचा फार्स केला आहे. सदर सभेपूर्वी नियमानुसार कारखान्याच्या सभासदांना अंदाजपत्रक, ताळेबंद, सभेची नोटिस काहिही दिलेले नाही. यात सर्व संशयास्पद करभार स्पष्ट होतो आहे. त्याच बरोबर कारखाना कार्यक्षेत्रात गटवार सध्या किती ऊस क्षेत्र आहे यांची अधिकृत कोणतीही माहिती त्यांनी जाहीर केलेली नाही.

जर कारखान्याला विविध प्रकारची २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त येणी असतील तर त्याबाबत काहीच कार्यवाही न करता केवळ कारखान्याची मालकीची राज्य सह. बँकेच्या ताब्यात असलेली जमीन मनमानी पद्धतीने विक्री करण्याचा विद्यमान चेअरमन व संचालक मंडळाने घाट घातला आहे त्या प्रक्रियेला तात्काळ दोन दिवसांत आपण स्थगिती द्यावी. मृत संभासदांच्या वारसांच्या नोंदी घेण्याची प्राधान्य क्रमाने कार्यवाही करणे आवश्यक असताना अद्याप पर्यन्त १० महिन्यात मृत संभासदांच्या वारसांच्या नोंदी न घेणे, शेअर ट्रान्सफर करणेची कार्यवाही केली नाही ही चेअरमन व संचालक मंडळाची अक्षम्य चूक आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून कारभाराची आपण व्यक्तीश: चौकशी करून जमीन विक्री प्रक्रियेला स्थगिती द्यावी .अशी मागणी या निवेदनात केली आहे .

## थोडक्यात




### भारतीय मेन्सवेअर ब्रँड 'तस्वा'चे मुख्य स्टोअर पुण्यात सुरू

पुणे (आरंभ पर्व) : आधुनिक भारतीय पुरुषांसाठी विवाहप्रसंगाच्या पोशाखांचा ब्रँड असलेल्या 'तस्वा'ने पुण्याच्या मध्यभागी आपले शानदार फ्लॅगशिप स्टोअर सुरू केले आहे. प्रसिद्ध डिझायनर तरुण ताहिलियानी यांच्या सहकार्याने आदित्य बिर्ला फॅशन अँड रिटेल लिमिटेड (एबीएफआरएल) ने हा ब्रँड लाँच केला आहे. हे नवीन स्टोअर नावाजलेल्या वासुपूज्य स्वामी महाराज मंदिराजवळ, ६५८ साचापीर स्ट्रीट, एमजी रोड, कॅम्प, पुणे - ४११००१ येथे २४०० चौरस फुटात पसरले असून कलाकुसरीने तयार केलेल्या कपड्यांद्वारे आणि खरेदीच्या अनोख्या अनुभवाद्वारे लक्झरी आणि सुंदरता प्रदान करण्याच्या 'तस्व'च्या कटिबद्धतेला ते बळकटी देते. अधिक माहिती www.tasva.com वर उपलब्ध आहे. या भव्य उद्घाटन सोहळ्याला बॉलीवूड अभिनेता विजय वर्मा आणि तस्वाचे ब्रँड हेड श्री. आशिष मुकुल उपस्थित होते. पुण्यातील हे स्टोअर केवळ रिटेल स्पेस पेक्षाही अधिक अनुभव प्रदान करते. भारतातील बहुसांस्कृतिक पुरुषांच्या विकसित होत असलेल्या अभिरुचीशी जुळवून घेण्याच्या दृष्टीने त्याचे डिझाईन केलेले आहे. वारशाची प्रेरणा असलेली सौंदर्यात्मकता आणि समकालीन कौशल्याचे मिश्रण असलेल्या या स्टोअरमध्ये आधुनिक भारतीय पुरुषांच्या कपड्यांना नवा अर्थ देण्याच्या तस्वाच्या दृष्टिकोनाचे प्रतिबिंब पडले आहे. या स्टोअरमध्ये तस्वाचे उत्सवी कलेक्शन असून त्यामध्ये आकर्षक कुर्ता सेट आणि बुंदी हे प्रमुख आहेत. यात आकर्षक स्क्रीन प्रिंट्स आणि आधुनिक सिल्हाऊट्स असून ती पारंपारिक पोशाखाला नवीन वळण देतात. दरम्यान, वेडिंग कलेक्शनमध्ये आलिशान शेरवानी, अचकन, इंडो-वेस्टर्न आणि बंद गळे असून ते उंची कापडांपासून बनवलेले आहेत आणि बारीक भरतकामाने सजवलेले आहेत.

## 'आता थांबायचं नाय' चित्रपटाचं शीर्षक गीत प्रदर्शित !!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्राच्या मातीतील एका प्रेरणादायी सत्यकथेवर आधारित 'आता थांबायचं नाय' हा नवा मराठी चित्रपट १ मे पासून आपल्या जवळच्या थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. महिलादिनी झी स्टुडिओज, चॉक अँड चीज फिल्म्स आणि फिल्म जॅझ यांनी 'आता थांबायचं नाय' या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित केला होता. आता ह्याच सिनेमाचं मनाला भिडणारं शीर्षक गीत 'आता थांबायचं नाय' प्रदर्शित झालंय. हे गाणं, असं सेलिब्रेशन आहे जे जीवनाच्या नवीन प्रवासाचा, उंच भरारी घेण्याचा, नवे स्वप्न पाहण्याचा




आणि ते पूर्ण करण्यासाठी घेतलेला ध्यासाचा आनंद व्यक्त करते. या गाण्याचे वैशिष्ट्य म्हणजे मराठी सिनेसृष्टीतील अनेक उत्तम कलाकार ह्या एका गाण्यात आहेत .

## महिला सुरक्षा उपक्रमामध्ये अलिमा इंडियाचा सहभाग

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"सखी सुरक्षा" उपक्रमाचा एक भाग म्हणून दापोडी स्थित अलिमा इंडिया कंपनीने महिला सुरक्षेकरिता विशेष करून तयार करण्यात आलेले माहिती साहित्याच्या मदतीने करण्यात येणाऱ्या जनजागृती मोहिमेला निधी स्वरूपात योगदान दिले आहे. संकटाच्या परिस्थितीत हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध असतील याची खात्री करण्यासाठी अलिमा इंडिया कंपनीने सार्वजनिक बसचा वापर करून जनजागृती मोहिम सुरू केली आहे.




पिंपरी-चिंचवडमध्ये हजारो महिला दैनंदिन प्रवासासाठी सार्वजनिक वाहतूकीवर अवलंबून असतात.गरज असल्यास महिलांना आपात्कालीन हेल्प लाईनक्रमांक उपलब्ध असतील,याची खात्री करण्यासाठी अलिमा इंडियाने बस जाहिरात मोहिम सुरू करून, महिला सुरक्षेप्रती आपली वचनबध्दता दर्शविली आहे.हा क्रमांक सहज उपलब्ध व्हावा,यासाठी अनेक बसेसवर जांभळ्या रंगांच्या फलकांसह हा क्रमांक दिसेल.

याच उपक्रमाचा एक भाग म्हणून प्रगत स्टेनलेस स्टील आणि विशेष मिश्र धातूंमधील उच्च - मुल्यवर्धित उत्पादनांची आघाडीची कंपनी अलिमाइंडिया सर्व दामिनी अधिकारी,22 पोलिस स्टेशन आणि संपूर्ण महाराष्ट्रात ५००० मार्गदर्शक पुस्तिका, माहिती कार्डस वितरित करत आहेत.

अलिमा कंपनीच्या बिझनेस युनिट ट्युब एपीएसीच्या विपणन व्यवस्थापक व कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिब्लिटी अधिकारी साईप्रिया परांजपे म्हणाल्या, बस मोहिमेचे उद्दिष्ट सार्वजनिक वाहतूकीवर हेल्पलाईन क्रमांक अधिक स्पष्ट आणि दृश्यमान करून जागरूकता निर्माण करणे आणि या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे हे आहे.कार्यक्रमाच्या पुढील टप्प्याचा भाग म्हणून आम्ही तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण करून माहितीची उपयोगिता वाढवण्याचा प्रयत्न करत आहोत,ज्यामुळे मदत मिळणे अधिक जलद व सोपे होईल.

## पाणी सुरक्षा बळकट करणे : पेप्सिको इंडियाचा भागीदारीमध्ये दृष्टिकोन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक जल दिनानिमित्त, पेप्सिको इंडिया 'प्रगतीची भागीदारी' या तत्वज्ञानाला धरून, पाण्याच्या शाश्वततेला चालना देण्याच्या तिच्या प्रयत्नांना पुन्हा एकदा बळकटी देते. पाण्याचे व्यवस्थापन दिर्घकाळापासूनच पेप्सिकोचे सर्वात महत्त्वाचे प्राधान्य राहीले आहे; ज्यामध्ये कंपनी तिच्या कार्यासाठी, आसपासच्या परिसंस्था आणि स्थानिक समाजासाठी सर्वात जास्त-जोखीम असलेल्या पाणलोट क्षेत्रांचे आरोग्य सुधारण्यासाठी उपक्रम राबवत आहे. हा सर्वांगीण विचाराचा दृष्टिकोन पाण्याची कार्यक्षमता सुधारणे, सुरक्षित पाण्याची उपलब्धता वाढवणे आणि पाण्याचे स्रोत पुन्हा




भरणे यावर लक्ष केंद्रित करतो.

अल्टरनेटिव्ह डेव्हलपमेंट इनिशिएटिव्हज (ADI) च्या भागीदारीत, पेप्सिको इंडियाचा शाश्वत जल संसाधन विकास आणि व्यवस्थापन (SWRDM) कार्यक्रमाचे पाणलोट पातळीवर भू-जलविज्ञान नियोजनाद्वारे जमिनीखालील पाण्याचे स्त्रोत पुन्हा भरण्यासाठी साहाय्य देण्याचे उद्दिष्ट आहे. संगरूर (पंजाब), पुणे (महाराष्ट्र) आणि मथुरा (उत्तर प्रदेश) सारख्या प्रदेशांमध्ये दरवर्षी भूजल पुनर्भरण प्रयत्नांचा विस्तार करून हे साध्य केले जाते. SWRDM कार्यक्रमाचा लाभ 70,000 हून अधिक लोकांना झाला आहे आणि 35 रेन वॉटर हार्वेस्टिंग संरचनेच्या बांधकामाद्वारे 1,000 दशलक्ष लिटर जमिनीखालील पाण्याची पातळी भरण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

पेप्सिको इंडियाचे जलसंवर्धन उपक्रम पायाभूत सुविधांच्या पलीकडे बरेच काही आहेत - ते दीर्घकालीन, स्वावलंबी मॉडेल तयार करतात जे व्यक्तींना सक्षम करतात आणि कृषी क्षेत्रात सुविधा मजबूत करतात.

धनगरवाडी गावातील शेतकरी आणि SHG सदस्य अनिता कान्हे आभार मानत म्हणाल्या, "आमच्या गावातील पाणी साठवण करण्याच्या तलावाला पुन्हा भरण्यात आले. तलाव भूजलाचे पुनर्भरण करत असल्याने, आता आमच्याकडे हातपंपाद्वारे पिण्यासाठी आणि उघड्या विहिरींद्वारे सिंचनासाठी पुरेसे पाणी आहे. पाण्याची उपलब्धता सुधारल्याने, आमचे शेती उत्पन्न 50% पेक्षा जास्त वाढले आहे. शेतीव्यतिरिक्त, पेप्सिको इंडिया आणि ADI कडून मिळालेली प्रेरणा आणि प्रशिक्षणामुळे आम्ही महिला बचत गटांची स्थापना केली आहे. त्यांनी आम्हाला साबण बनवणे, शिवणकाम, परफ्यूम बनवणे आणि इतर कौशल्ये शिकवली ज्यामुळे आम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण करण्यास मदत झाली आहे. या आर्थिक स्थिरतेमुळे, आम्ही आता आमच्या मुलांना उच्च शिक्षण देऊ शकतो आणि त्यांना चांगल्या संधींसाठी बाहेर पाठवू शकतो. या उपक्रमाने आमचे जीवन खरोखरच बदलून टाकले आहे."

समाजाचा मोठ्याप्रमाणात सहभाग घेण्यासोबतच, पेप्सिको इंडियाने ADI च्या सहकार्याने विविध जल पुनर्भरण संरचना विकसित केल्या. दीर्घकालीन शाश्वतता वाढवण्यासाठी, या भागातील समाज सदस्यांना जलसंधारण तंत्रे, जलसाठ्यांची देखभाल आणि पाऊस आणि भूजल पातळी मोजण्याच्या पद्धतींचे प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमामुळे भूजल प्रणालीबद्दलची त्यांची समज वाढलीच नाही तर मालकी आणि जबाबदारीची भावना देखील निर्माण झाली. परिणामी, समाज या महत्त्वाच्या जलसंपत्तींच्या सामूहिक देखभालीमध्ये सक्रियपणे सहभागी झाला, ज्यामुळे त्यांच्या दीर्घकालीन संरक्षण होण्याची निश्चीती झाली.

# गिरीश कुलकर्णी 'ग्लोबल थॉट लीडर ऑफ द इयर २०२५' पुरस्काराने सन्मानित

### मंदिर परिसंस्थेत परिवर्तन घडवून आणल्याबद्दल केंब्रिज विद्यापीठात सत्कार



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

मार्च-टेंपल कनेक्टचे संस्थापक गिरीश वासुदेव कुलकर्णी यांना नुकतेच 'ग्लोबल थॉट लीडर ऑफ द इयर २०२५' या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. युनायटेड किंगडम अर्थात युकेतील केंब्रिज विद्यापीठाच्या फिट्झविल्यम कॉलेज येथे आयोजित 'स्किल लाईव्ह: व्हिजनरी व्हॉइसेस: नेटवर्किंग एक्सपीरियन्स' या कार्यक्रमादरम्यान त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. टेंपल कनेक्ट या नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून मंदिर व्यवस्थापनात क्रांतिकारक बदल घडवून आणल्याबद्दल आणि मंदिर परिसंस्थेच्या सुधारणेसाठी त्यांनी घेतलेल्या अथक प्रयत्नांची दखल म्हणून त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

लंडन ऑर्गनायझेशन ऑफ स्किल्स डेव्हलपमेंट (एलओएसडी) द्वारे आयोजित या कार्यक्रमात जगभरातील दूरदर्शी व्यक्ती, उद्योग क्षेत्रातील अग्रणी आणि विचारवंत एकत्र आले होते. या कार्यक्रमात अंतर्दृष्टीपूर्ण चर्चासत्रे, पुस्तक प्रकाशन तसेच उच्च स्तरावरील वैयक्तिक, सामाजिक आणि व्यावसायिक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. 'ग्लोबल थॉट लीडर्स ऑफ द इयर २०२५' या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन हे या कार्यक्रमातील मुख्य आकर्षण होते ज्यामध्ये गिरीश कुलकर्णी यांना सन्मानपूर्वक आमंत्रित करण्यात आले होते. हा कार्यक्रम विविध क्षेत्रांमध्ये अभूतपूर्व परिवर्तन घडवून आणणाऱ्या व्यक्तींना समर्पित आहे.

या गौरवाविषयी प्रतिक्रिया व्यक्त करताना गिरीश वासुदेव कुलकर्णी म्हणाले, ""ग्लोबल थॉट लीडर ऑफ २०२५" या पुरस्काराचा भाग होणे ही माझ्यासाठी अभिमानास्पद गोष्ट आहे. अत्यंत विनम्रपणे केंब्रिज विद्यापीठातर्फे मिळालेला हा सन्मान मी स्वीकारतो आहे आणि या सन्मानाने मला नवी प्रेरणा मिळाली आहे. रणनीतीक सहकार्याद्वारे मंदिर व्यवस्थापनात शाश्वत पण नाविन्यपूर्ण आणि तंत्रज्ञानाधारित सुधारणा आणण्यासाठी तसेच समाजाचे मंदिरांशी जुळलेले नाते अधिक बळकट करण्यासाठी कार्यरत असेलल्या 'टेंपल कनेक्ट' च्या उद्दिष्टांना बळकटी देणारा हा पुरस्कार आहे. नवनवीन प्रगतीला स्वीकारत सांस्कृतिक वारसा जपण्याचे आणि अध्यात्मिक अनुभव अधिक समृद्ध करण्याचे आमचे ध्येय दृढ करण्यासाठी या पुरस्काराने आम्हाला प्रेरणा दिली आहे."

गिरीश कुलकर्णी यांनी टेंपल कनेक्टच्या माध्यमातून मंदिर व्यवस्थापन, वारसा संवर्धन आणि धार्मिक पर्यटन यांना शिस्तबद्धरीत्या नव्याने परिभाषित केले आहे. मंदिरांची योग्य व्यवस्थापन पद्धती राखली जावी, ही पवित्र स्थळे श्रद्धा, इतिहास आणि शाश्वत विकास यांचे केंद्र म्हणून समृद्ध व्हावीत, यासाठी ते कार्यरत आहेत. या दृष्टीकोनातून गिरीश कुलकर्णी यांनी आंतरराष्ट्रीय मंदिर परिषद आणि प्रदर्शन (आयटीसीएक्स) ही अभिनव संकल्पना सुरू केली. ही संकल्पना मंदिर प्रशासक, धर्म विद्वान आणि या क्षेत्रातील तज्ज्ञांना आवश्यक माहिती व ज्ञानदान करणारे जगातील सर्वात मोठे व्यासपीठ म्हणून उदयाला आली आहे. लंडन ऑर्गनायझेशन ऑफ स्किल्स डेव्हलपमेंट (एलओएसडी) कडून मिळालेल्या या मान्यतेमुळे गिरीश कुलकर्णी यांचे कार्य आणि त्याचा जागतिक स्तरावर पडलेला प्रभाव आणि महत्त्व अधिक दृढ झाले आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.